**मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., गट नं. ३०, गाव दरेगाव (अतिरीक्त एमआयडीसी बाजूस), ता.जि. जालना येथे प्रस्तावीत केलेल्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये एमएस बिलेटस ७५० टीपीडी ते २००० टीपीडी आणि (रोलिंग मील) टीएमटी बारस् ८३३.३३ टीपीडी ते २००० टीपीडी चे उत्पादन करणे प्रस्तावाबाबत दिनांक ०७/०७/२०२२ रोजी दू. ०२:३० बाजता मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., गट नं. ३०, गाव दरेगाव (अतिरीक्त एमआयडीसी बाजूस), ता.जि. जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त :-**

---

मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., गट नं. ३०, गाव दरेगाव (अतिरीक्त एमआयडीसी बाजूस), ता.जि. जालना येथे प्रस्तावीत केलेल्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये एमएस बिलेटस ७५० टीपीडी ते २००० टीपीडी आणि (रोलिंग मील) टीएमटी बारस् ८३३.३३ टीपीडी ते २००० टीपीडी चे उत्पादन करणे प्रस्तावाबाबत दिनांक ०७/०७/२०२२ रोजी दू. ०२:३० वाजता मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., गट नं. ३०, गाव दरेगाव (अतिरीक्त एमआयडीसी बाजूस), ता.जि. जालना येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

सदर जाहीर लोक सुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. केशव नेटके,** : अध्यक्ष
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, जालना.

२. **श्री. सो. म. कुरमूडे,** : समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना.

जाहीर लोक सुनावणीस उपस्थित असलेले सदस्य आणि उपस्थित नागरिकांची यादी येथे जोडली आहे. डॉ. योगिनी बाळंखे, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष्यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., गट नं. ३०, गाव दरेगाव (अतिरीक्त एमआयडीसी बाजूस), ता.जि. जालना यांच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये एमएस बिलेटस ७५० टीपीडी ते २००० टीपीडी आणि (रोलिंग मील) टीएमटी बारस् ८३३.३३ टीपीडी ते २००० टीपीडी चे उत्पादन करणे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात येत आहे. सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'ब' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., यांचा पर्यावरण विषयक जाहीर

लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दिं. १२/०५/२०२२ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी जालना यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दिं. ०७/०७/२०२२ वेळ- दू. ०२.३० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. ०६/०६/२०२२ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या व याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने चार आक्षेप/प्रकल्पास संमती दर्शविणारे काही सुचना इ. ई-मेल द्वारे तसेच लिखीत स्वरूपात म.प्र.नि. मंडळ, जालना येथे प्राप्त झालेल्या आहेत. यासाठी त्यांनी श्री. एस.एम. कुरमुडे, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे समन्वयक यांना याबाबत माहिती देण्याची विनंती केली. श्री. एस.एम. कुरमुडे, यांनी सांगितले की, द टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) व दैनिक सकाळ (मराठी) या वर्तमानपत्रामध्ये नियमानूसार ३० दिवस अगोदर सदरच्या जाहीर लोकसुनावणी बाबत नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती तसेच प्रस्तावीत प्रकल्प बाबतचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेतील सारांश यांच्या प्रती संबंधीत ग्रामपंचायत कार्यालय दरेगाव, तसेच वेगवेगळी शासकीय कार्यालये जसे जिल्हाधिकारी कार्यालय जालना, तहसिल कार्यालय जालना, जिल्हा परिषद कार्यालय जालना, जिल्हा उद्योग केंद्र जालना, मंत्रालय, मुंबई, म.प्र.नि. मंडळाचे जालना, औरंगाबाद व मुंबई येथील कार्यालये या ठिकाणी लोकांच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या आणि सदर प्रकल्पाबाबत जर कुणाला काही सुचना, आक्षेप असतील तर ते त्यांनी वर्तमानपत्रामध्ये सदर प्रकल्पाबाबतची जाहीरात प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावे असे लोकांना आवाहन करण्यात आले होते. आणि त्या अनुषंगाने दिं. २४/०६/२०२२ रोजी दोन आक्षेप एक इंग्रजी व एक मराठी श्री. सारंगधर बालाजी ढवळे, दरेगाव, ता.जि. जालना यांच्याकडून प्राप्त झालेली आहेत या दोन्ही आक्षेपांची मधील मजकूर सारखाच आहे तसेच व्ही.सुनंदा रेड्डी, तेलंगना व एच. मधूबाबू, हैद्राबाद यांच्या कडून सुचना तसेच प्रकल्पास संमती दर्शविणारे इ. ई-मेल द्वारे प्राप्त झालेले आहे. या संदर्भात त्यांनी कारखान्याचे प्रतिनीधी यांना याबाबत त्याचं मत मांडावे अशी विनंती केली. यावर श्री. नितीन काबरा, प्रस्तावित प्रकल्पाचे संचालक यांनी सांगितले की, जे काही आक्षेप प्राप्त झालेले आहेत त्याबाबत उत्तरे देण्यात येतील तसेच ते म.प्र.नि. मंडळ ला सादर करण्यात येतील. तसेच एका आक्षेपात नमूद केलेल्या दिनांक १८/०६/२०२२ च्या एका बातमीबाबत श्री. एम.एम. कुरमुडे, यांनी स्पष्ट केले की, या वृत्तपत्रांमध्ये जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आलेली नव्हती. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दैनिक सकाळ आणि टाइम्स ऑफ इंडिया या वृत्तापत्रामध्ये दिं. ०६/०६/२०२२ रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच इंग्रजी व मराठीतील सारांश यांच्या प्रती संबंधीत शासकीय कार्यालये येथे ठेवण्यात आलेल्या होत्या. तसेच त्यांनी नमूद केले की, सद्यस्थितीच्या कारखान्यामध्ये जे उत्पादन सूरू आहेत त्याबाबत रितसर सर्व परवानग्या म.प्र.नि. मंडळाकडून घेण्यात आलेल्या आहेत. तसेच सदरची लोकसूनावणी प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पासाठी घेण्यात येत आहे. त्यानंतर त्यांनी सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

प्रकल्प सल्लागार श्री. राजेश मानकर, मे. श्री साई मानसा, नेचर टेक प्रा.लि., हैद्राबाद यांनी प्रस्तावित प्रकल्पा बाबतचे पावर पॉईंट सादरीकरण ज्यामध्ये पर्यावरण आघात मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे

प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी चा समावेश आहे. आणि सांगितले की, विद्यमान व प्रस्तावित प्रकल्पामध्ये एमएस बिलेटस ७५० टीपीडी ते २००० टीपीडी आणि (रोलिंग मील) टीएमटी बारस् ८३३.३३ टीपीडी ते २००० टीपीडी चे उत्पादन करणे बाबत आहे. आणि आजच्या जाहीर लोकसूनावणीचे आयोजन हे मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि. या प्रस्तावित स्थळी करण्यात आलेले आहे. त्यांनी सांगितले की, टीओआर (संदर्भ व अटी) मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि. यांना प्राप्त झालेला आहे. प्रस्तावित विस्तार प्रकल्पासाठी राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) नुसार त्यांनी पर्यावरण सल्लागार, मे. श्री साई मानसा, नेचर टेक प्रा.लि., हैद्राबाद मार्फत आधारभूत निरीक्षण अभ्यास केला आहे आणि पर्यावरण आघात मूल्यांकनाचा मसुदा सादर केला आहे, त्यानुसार आपण सर्वजण पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी येथे जमलो आहोत. मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि. कारखान्याची स्थापना सन २००४ मध्ये झाली आहे. प्रकल्पासाठी एकूण ८.५१ हेक्टर जमीन वापरली जाईल, त्यापैकी ३६.६० टक्के क्षेत्र हरित पट्टा विकासासाठी राखीव असेल, असे त्यांनी नमूद केले. आणि नंतर त्यांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केले. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांमध्ये नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर डॉ. योगिनी बाळंखे, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, सदर प्रकल्पासंबंधी जर कुणाला काही प्रश्न, सुचना, टिप्पणी, विचार इ. मांडायचे असतील तर ते त्यांनी त्यांचे नांव व गावाचे नांव सांगून विचारावेत.

जाहीर लोकसूनावणी दरम्यान उपस्थित नागरिकांनी सदर प्रकल्पा संबधी काही प्रश्न उपस्थित केले व प्रकल्पाचे संचालकाने त्यांची उत्तरे ही खालीलप्रमाणे आहे.

१. **श्री. प्रताप बाळासाहेब पडूळ**, रा. जालना यांनी मुददा उपस्थित केला की, या प्रकल्पात स्थानिक लोकांना नोकरी मिळेल का. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, सद्यस्थितीतही जालना जिल्ह्यातील आणि विशेषत: प्रकल्पाच्या आजूबाजूच्या गावातील ७५% पेक्षा जास्त लोक सध्याच्या प्रकल्पात कार्यरत आहेत आणि प्रस्तावित प्रकल्पात जवळपासच्या गावातील तरुणांना नक्कीच प्राधान्य दिले जाईल.

२. **श्री. अनिल रंगनाथराव भाले**, रा. रेवगाव यांनी मुददा उपस्थित केला की, या प्रकल्पामूळे आजूबाजूच्या परिसरातील लोकांना काही फायदा होईल का. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, या प्रकल्पामूळे आजूबाजूच्या परिसरातील लोकांना नक्कीच फायदा होईल

जसे की, रोजंगार निर्मीती, वृक्षारोपण आणि शाळांमधील उपक्रम इत्यादी विविध योजनाद्वारे आजूबाजूच्या गावातील लोकांना प्रकल्पाचा नक्कीच फायदा होईल.

३. **श्री. अर्जून मोरे,** रा. जालना यांनी मुददा उपस्थित केला की, प्रकल्पातील बॅग फिल्टर मधून निघणाऱ्या धुरासाठी कंपनीने काय उपाययोजना केलेल्या आहेत. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, लोखंडी स्क्रॅप वितळून सळया बनवताना जो धूळीचा उत्सर्ग होतो त्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या उत्पादनासाठी अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविलेली आहे व तसेच पस्तावित प्रकल्पासाठीही हि बसविली जाईल.

४. **श्री. दिपक शंकरलाल चौधरी,** रा. जालना यांनी मुददा उपस्थित केला की, कारखान्यातून निर्माण होणारे सांडपाणी कारखान्याच्या बाहेर सोडले जाईल, मग ते थांबविण्यासाठी काय उपाय करणार. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, या कारखान्यातून कोणत्याही प्रकारचे सांडपाणी कारखान्याच्या बाहेर जात नाही आणि यंत्रसामग्री थंड करताना जे पाणी लागते त्याचे बाष्पीभवन होते आणि घरगुती वापरासाठी जे काही पाणी वापरले जाते ते प्रक्रियेनंतर पुनर्वापर उद्योग परिसरातील झाडासाठी केला जाईल.

५. **श्री. लखन नाइकवाडे,** रा. घानेवाडी यांनी मुददा उपस्थित केला की, प्रकल्प धारकाकडून समाजासाठी काय योजना आहेत. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, अगोदर प्रकल्पाचे सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे, कोरोनाच्या काळात जिल्हयात ऑक्सिजनची कमतरता असल्याने कंपनीने केवळ १८ दिवसांत ऑक्सिजन प्लांट बसवला होता. आणि बहुतेक वेळा रक्तपेढीत रक्ताची कमतरता असते त्यामुळे आपल्या कंपनीचे सर्व कर्मचारी व कामगार स्वेच्छेने रक्तदान करत असतात. जवळपासच्या गावांमधील शाळांमध्ये ई-लर्निंगसारखे विविध कार्यक्रम राबवले जातात. वृक्षारोपण करणे, जसे की अगोदर सांगितल्याप्रमाणे जालना जिल्हयातील पारसी टेकडी येथे जवळपास २०००० झाडे लावण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे, त्याचप्रमाणे कंपनीतर्फे समाजाच्या विकासासाठी विविध कार्यक्रम घेतले जातात आणि भविष्यातही कंपनी असे उपक्रम राबवणे सुरू ठेवणार आहे.

६. **श्री. श्रीहरी व्ही. राखे,** रा. चंदनझिरा यांनी मुददा उपस्थित केला की, कारखाण्यातील रस्त्यावरील धुळीसाठी काही उपाययोजना व तरतुदी आहेत का. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, धूळ निर्माण होवू नये यासाठी रस्त्यावर पाणी शिंपडले जाते आणि ज्या रस्त्यांवरून अवजड वाहने जातात त्या रस्त्यांचं येत्या काळात सिमेंट कॉंक्रिटीकरण केले जाईल, कारखान्याचा

बहुतांश अंतर्गत भाग कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे उर्वरित संपूर्ण भाग तसेच प्रस्तावित प्रकल्पामध्ये रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात येईल.

७. **श्री. विलास संजय गारखेडे,** रा. जवसगाव येथील रहिवाशी यांनी मुददा उपस्थित केला की, प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वायू प्रदूषणासाठी काय उपाययोजना केलेल्या आहेत. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, अगोदरच्या विद्यमान प्रकल्पामध्ये प्रायमरी आणि सेकंडरी एअर सक्शन सयंत्रणा तसेच बॅग फिल्टर व चिमणी अशी अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात आली आहे जी की सध्या कार्यान्वित आहे. आणि तीच प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा प्रस्तावित नवीन प्रकल्पामध्ये बसविण्यात येणार आहे आणि बॅग फिल्टरचा वापर करून, निर्माण होणारी धूळ वेगळे केली जाईल आणि शुद्ध हवा वातावरणात जाईल.

८. **श्री. दिलीप पिराजी तिरूखे,** रा. दरेगाव येथील रहिवाशी यांनी मुददा उपस्थित केला की, कंपनीतील चिमणीमधून निघणाऱ्या धुरासाठी कंपनीने काय उपाययोजना केलेल्या आहेत. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, मा. जिल्हाधिकारी, जालना व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या मार्गदर्शन तत्वानूसार सद्यःस्थितीच्या प्रकल्पाला धूर नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात आलेली आहे. त्यांनी अतिशय आनंदाने सांगितले की, या यंत्रणेमूळे हा प्रकल्प संपूर्ण भारतामध्ये प्रसिद्ध झाला आहे. प्रस्तावित नवीन प्रकल्पात त्याच प्रकारचे नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात येणार आहे.

९. **श्री. गणेश तूकाराम ढवळे,** माजी सरंपच दरेगाव, रा. दरेगाव येथील रहिवाशी यांनी विचारले की, दरेगावातील नागरीकांना आपल्या कंपनीमूळे रोजगार मिळाला आहे. अगोदर दरेगाव ग्रामपंचायतीला कंपनीतर्फे व्यवसाय कर येत होता, परंतू गेल्या दोन ते तीन वर्षांपासून सदर कर भरणे बंद झाले आहे, त्यांनी प्रकल्प धारकाला विनंती केली की, कारखाना ग्रामपंचायतीजवळ असल्याने त्यांची मागणी आहे की, ग्रामपंचायत दरेगाव ला कर भरायची पून्हा सूरूवात करावी. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी सांगितले की, सदरचा मुद्दा त्यांच्या अखत्यारीत येत नसून तो नगरपरिषद, जालना व ग्रामपंचायत यांच्या समन्वयाने ते भरतील. आणि ते आधीच हा कर भरत आहेत. त्यांनी पूढे सांगितले की, सदरचा विषय आमच्या कार्यक्षेत्रा बाहेर असल्यामूळे त्यासाठी आपण शासकीय कार्यालयाकडे या प्रस्तावासाठी विनंती करूत.

१०. **श्री. रामकिसन ढवळे,** सरंपच दरेगाव, रा. दरेगाव येथील रहिवाशी यांनी विनंती केली की, दरेगाव ग्रामपंचायतला पूर्वी एमआयडीसीकडून वीज मिळत होती आता पून्हा एमआयडीसीकडून वीज मिळेल

का. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी सांगितले की, यावर मी उत्तर देण्यास असमर्थ आहे आणि त्यांनी या संदर्भात एमएसईबी मंडळाकडे संपर्क साधून प्रतिनिधित्व करावे लागेल असे सुचवले. त्यांनी पूढे निदर्शनास आणून दिले की, त्यांच्या माहितीनुसार एमएसईबी ने दरेगाव जवळील रेल्वे ट्रॅकसाठी एक नवीन उपकेंद्र बसविले आहे, ज्यातून त्यांना वीज पुरवठा करण्यास कोणतीही हरकत नाही कारण त्या उपकेंद्राचा पुरवठा एमआयडी च्या फिडरमधून केला आहे.

११. **श्री व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, तेलंगणा** यांनी प्रकल्प व्यवस्थापनाला शुभेच्छा आणि समर्थन दिले. या उद्योगाला बिनशर्त पर्यावरणीय मंजुरीसाठी MoEF&CC कडे शिफारस करत असल्याचे नमूद केले. एक यशस्वी उद्योगपती म्हणून प्रकल्प धारकाला त्यांच्या यशस्वी भूमिकेसाठी शुभेच्छा दिल्या आणि विकासाच्या कामासाठी काळजी घ्यावी अशी विनंती केली. त्यांनी पुन्हा एकदा प्रकल्पासाठी शुभेच्छा दिल्या आणि सांगितले की पर्यावरण सल्लागार कंपनीचे अभिनंदन आपण चांगला EIA अहवाल तयार केला आहे.

डॉ. योगिनी बाळंखे, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना यांनी उपस्थितांना विचारले की, अजुनही कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना/टीप्पणी नव्हती.

डॉ. योगिनी बाळंखे, यांनी जाहीर लोकसूनावणी समितीचे अध्यक्ष व समन्वयक यांच्या परवानगीने तसेच उपस्थित नागरिकांचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त केली. या प्रकल्पाबाबत प्राप्त झालेल्या सूचना/आक्षेपांच्या प्रती आणि प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे सोबत जोडण्यात आलेली आहेत.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

**सौ. म. कुरमुडे**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, जालना.

**केशव नेटके**
(अध्यक्ष)
तथा
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी जालना.

**MINUTES OF ENVIRONMENTAL PUBLIC HEARING IN RESPECT OF PROPOSED EXPANSION OF MS BILLETS 750 TPD TO 2000 TPD & FOR EXPANSION OF ROLLING MILLS FOR MANUFACTURING OF TMT BARS – 833.33 TO 2000 TPD PROJECT AT GUT NO. 30, VILLAGE DAREGAON (ADJACENT TO MIDC JALNA), TQ. & DIST: JALNA, MAHARASHTRA PROPOSED BY M/S. BHAGYALAXMI ROLLING MILLS PVT. LTD., CONDUCTED ON 07/07/2022 AT 02.30 P.M. AT M/S. BHAGYALAXMI ROLLING MILLS PVT. LTD., GUT NO. 30, VILLAGE DAREGAON (ADJACENT TO MIDC JALNA), TQ. DIST: JALNA, MAHARASHTRA.**

---

An environmental public hearing in respect of proposed **Expansion project of MS Billets 750 TPD to 2000 TPD & for Expansion of Rolling Mills for Manufacturing of TMT Bars – 833.33 to 2000 TPD** project location at Gut No. 30, Village Daregaon (Adjacent to MIDC Jalna), Tq. & Dist: Jalna, Maharashtra proposed by **M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd.**, Gut No. 30, Village Daregaon (Adjacent to MIDC Jalna), Tq. & Dist: Jalna, Maharashtra was conducted on 07/07/2022 at 02.30 p.m. at M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd.,Gut No. 30, Village Daregaon (Adjacent to MIDC Jalna), Tq. Dist: Jalna, Maharashtra.

Following Panel members were present during the public hearing :

1. **Shri Keshav Netake,**
   Additional District Magistrate, Jalna,
   Dist: Jalna. — Chairman.

2. **Shri S.M. Kurmude,**
   Sub-Regional Officer,
   M.P.C. Board, Jalna. — Convener.

A list of members and public participants present for Public Hearing is annexed herewith. All those present were given welcome by **Dr. Yogini Balankhe**, Field Officer from Maharashtra Pollution Control Board and started the proceedings of said public hearing with the permission of the Chairman of said Public Hearing Panel. She stated that today, Maharashtra Pollution Control Board has organized the Environmental Public Hearing regarding the proposed Expansion Project of MS Billets 750 TPD to 2000 TPD & for Expansion of Rolling Mills for manufacturing of TMT Bars – 833.33 to 2000 TPD in respect of M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd., Gut No. 30, Village Daregaon (Adjacent to MIDC Jalna), Tq. & Dist: Jalna. She stated that as per the Ministry of Environment, Forests & Climate Change, Govt. of India, New Delhi Notification dated 14/09/2006, the said project falls under '**B**' Category for which Environmental Clearance is necessary from MoEF&CC and as a part of it, it is mandatory to conduct the Environmental Public Hearing, hence said public hearing is being conducted. The proposal of **M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd.** for conducting Environmental Public Hearing is received to MPCB on 12/05/2022, accordingly, with the permission of the Hon'ble District Collector, Jalna, the date and time for said public hearing is fixed on 07/07/2022 at 02.30 p.m.and according to which, a public notice regarding the Environmental Public Hearing is published in

the newspapers Daily Sakal (Marathi) and Daily Times of India (English) dated 06/06/2022 before 30 days as per the rules. The copies of (Information Booklet) Environment Impact Assessment and Executive Summary of the said project were placed at various concerned Government Offices in the district, Grampanchayat, Daregaon and offices of Maharashtra Pollution Control Board at Mumbai, Aurangabad and Jalna and hoisted on the website of Maharashtra Pollution Control Board also, so that it shall be useful to the people for study and they shall record their suggestions, notes, objections, if any regarding the said project within 30 days at this office; and the order for said public hearing has been issued by the Member Secretary, M.P.C. Board vide letter dated 30/06/2022. She stated that according to said public hearing, some suggestions, objections are received at M.P.C. Board for which, she requested **Shri S.M. Kurmude**, Sub-Regional Officer, M.P.C. Board, Jalna & Convener of Environmental Public Hearing to brief about the same. **Shri Kurmude** stated that two suggestions and two objections are received to this office by E-mail & in hard copy, out of those two objections dated 24/06/2022, one is in Marathi and another is in English this are received from Shri. Sarangdhar Balaji Dhawale, Daregaon village and both are one and same. He requested that the Project Proponent may tell about the points mentioned in the said objections. **Shri Nitin Kabra**, the Project Director stated that two letters are regarding objection to which they are submitting reply in writing to M.P.C. Board and two letters are in support of the proposal, **Shri Kurmude** stated that in one of the objections, it is mentioned as "Daily Parshwabhumi, News published on 18/06/2022, for which he clarified that a notice regarding said public hearing has been published in the newspapers Daily Sakal dated 06/06/2022 and Daily Times of India dated 06/06/2022 before 30 days as well as related documents were placed at all the concerned local Government offices like Grampanchayat, Daregaon, Zilla Parishad, Tehsil Office, Collector Office, District Industries Centre for studying for the citizens. He also stated that all the necessary permissions are taken for the existing plant, which is now in operation and now at present the hearing is being conducted is for expansion in which there will be increase in production. After that, **Dr. Balankhe** requested the Project Proponent/Project Consultant to brief the presentation of said project.

Then, **Shri Rajesh Mankar**, the Project Consultant from M/s. Sri Sai Manasa Nature Tech Pvt. Ltd., Hyderabad started the power point presentation of the existing and proposed project including the details of project, environmental pollution, plans, devices, control measures to be taken thereof and stated that said public hearing is proposed for the proposed Expansion project of MS Billets from 750 TPD to 2000 TPD & (Rolling Mills) TMT Bars – 833.33 TPD to 2000 TPD and to obtain Environmental Clearance for said project. He briefed about introduction of said project and stated that at present, the production of MS Billets and TMT Bars is taken at existing project and said project is proposed for increasing said production capacity, i.e. as reported earlier MS Billets – 2000 TPD and TMT Bars – 2000 TPD and to obtain Environmental Clearance. **M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd.** has been established in the year 2004 and is registered under the Factory Act, 1956. He showed names of the Directors of the Company He stated that a TOR (Terms of Reference) has been received to said company and according to which the Environment Consultant has prepared Environment Impact Assessment by carrying out Baseline Environmental Study for a period of three months and submitted the draft EIA report to Maharashtra Pollution Control Board and as per the public notice of MPCB, the said public hearing is being conducted today. He stated that the total land of **8.51** hectares will be

used for expansion of said project, out of which **36.60%** area will be reserved for Green Belt Development.

Then, **Dr. Yogini Balankhe**, Field Officer, MPCB, Jalna requested the public participants that if anybody would like to ask any question, suggestion, notes, etc. regarding said project, same may be asked by telling their own name and village name.

During the course of public hearing, certain questions related with said project raised by the public participants and answered the same by the Project Proponent are as below :

1. **Shri Balasaheb Padol**, a resident of Jalna town asked whether job will get to the local people in the said project, upon which **Shri Nitin Kabra** stated that at present also, more than **75%** people from Jalna district and especially from the surrounding villages of the project are employed in the existing project and preference will be given to the youths in nearby villages in the proposed project.

2. **Shri Anil Rangnathrao Bhale**, a resident of village Revgaon, Tq. & Dist: Jalna after asking whether there will be any benefit to the people in surrounding area, **Shri Kabra** stated that definitely the people in the neighboring villages will get benefit from the factory through various systems like employment, tree plantation and activities in the schools, etc. to be carried out by the factory.

3. **Shri Arjun More**, a resident of Jalna town asked about the planning to be done for the dust from bag filter. **Shri Kabra** stated that the dust is captured completely and separated and the air remains in it is dispersed into the atmosphere after purifying and the valuable factors from the separated dust particles are also recovered.

4. **Shri Deepak Chaudhari**, a resident of Jalna town asked that waste water to be generated from the factory will be discharged outside the factory, so what efforts will be taken to stop the same. **Shri Kabra** clarified that from this factory, no any type of water is discharged outside the factory and whatever the water is evaporated during the cooling of machineries, is required to be added and whatever the water used for domestic purpose is recycled in the process after treatment.

5. **Shri Lakhan Naikwade**, a resident of village Ghanewadi, Tq. & Dist: Jalna asked the Project Proponent that what will be done for the society by the factory. **Shri Kabra** stated that as reported during the presentation, as there was deficiency of oxygen during Corona period, the company has installed a Oxygen Plant within **18** days only and most of the time there is deficiency of blood in Blood Bank, so all the employees and workers of the company donate the blood voluntarily, various programmes like e-learning in schools in the nearby villages, tree plantation viz. programme of planting **20000** trees at Parasi Tekadi is taken in hand, likewise programmes are taken by the company for society and and such programmes will be continued in future also.

6. **Shri Shrihari Rakhe**, a resident of village Chandanzira, Tq. & Dist: Jalna asked that whether there are any measures and provisions for the dust on the road, **Shri Kabara** stated that at present, the dust is suppressed by sprinkling water on the road and the roads from where heavy vehicles move will be concretized in coming period, most of the internal part of the factory is concretized and the complete remaining part will be concretized in the proposed project.

7. **Shri Vilas Sanjay Garkhede**, a resident of village Jawasgaon, Tq. & Dist: Jalna asked about the measures to be taken for the air pollution to be caused from the company, upon which **Shri Kabra** as reported earlier, stated that primary and secondary air suction system is provided at the existing project, which is in operation and same system will be provided in the proposed project and by using bag filter, dust will be separated and pure air will be dispersed into the atmosphere.

8. **Shri Dilip Piraji Tirukhe**, a resident of village Daregaon, Tq. & Dist: Jalna after asking about smoke emission from stack, **Shri Kabra** stated that a Air pollution Pollution Control system & upgraded & installed under the guidance of the District Collector and MPCB and the said project is becoming famous throughout India and same type of project will be installed at the proposed project.

9. **Shri Ganesh Tukaram Dhawale**, the Ex. Sarpanch, Daregaon, Tq. & Dist: Jalna stated that earlier, the factory was paying the business tax to the Grampanchayat, Daregaon, which is stopped now, and requested to start to pay the said tax to their Grampanchayat again, but **Shri Kabra** clarified that the said issue is not in their purview and they will pay the same in co-ordination with the Municipal Council, Jalna and Grampanchayat and already they are paying the said tax, **Shri Dhawale** stated that it is stopped to pay the tax since last two-three years, upon which **Shri Kabara** stated that is being paid to Municipal Council. **Shri Dhawale** stated that as the factory is near to the Grampanchayat, it is their demand, but **Shri Kabra** stated that it is beyond his purview and they will have to represent it to the Government for the same.

10. **Shri Ramkisan Dhawale**, the Sarpanch, Daregaon, Tq. & Dist: Jalna stated that earlier they were getting the electricity from MIDC and asked whether they can get the electricity from MIDC, now, upon which **Shri Kabra** stated that he is unable to answer for the same and suggested that they shall have to approach and give representation to MSEB in this regards. He pointed out that as per his information, the MSEB has installed a new Sub-station for railway near to Daregaon, from which they shall have no any objection for giving electricity supply as the supply to said Sub-station is from MIDC.

11. **Shri V. Sunanda Reddy**, an Environmentalist, Telangana gave his best wishes to the management and stated that he is recommending to MoEF&CC to give unconditional permission to said industry, he is wishing the industry for its best

role as a successful industrialist and requested to take care for development. Once again he gave his best wishes for the project and stated that he congratulates the Environmental Consultancy who has prepared a good EIA report.

**Dr. Yogini Balankhe**, Field Officer from MPCB, Jalna once again requested the public participants that if anybody is still having any question, suggestion, objection, etc., same may be asked, but after observing that nobody is having any question, suggestions, objections, etc. regarding said project, she, with the permission of the Chairman of Public Hearing Panel concluded the Public Hearing with a vote of thanks to all the public participants

The copies of suggestions/objections received regarding the said project and the replies given to them by the Project Proponent are enclosed herewith.

Lastly, the Public Hearing ended with a vote of thanks to the **Chair**.

**(S.M. Kurmude)**
Convener
And
Sub-Regional Officer, MPCB, Jalna

**(Keshav Netake)**
Chairman
And
Additional District Magistrate, Jalna